स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखा अंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी.पदवीसाठी सादर करावयाच्या संशोधन प्रबंधाची स्थूल रुपरेषा

“महाराष्ट्रातील माजी मुख्यमंत्र्यांवर लिहिलेल्या मराठी साहित्यकृतीचा चिकित्सक अभ्यास”

(विशेष संदर्भ : यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, शरद पवार, शंकरराव चव्हाण, सुशीलकुमार शिंदे)

संशोधक

अशोक गणपतराव दवणे

एम.ए. (मराठी)

Mob.No.9890381958

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ.नागनाथ पाटील

योगानंद महाविद्यालय वसमत, जि.हिंगोली

Email ID : patilnagnathr@gmail.com

Mob.No.9422187968

संशोधन केंद्र

पीपल्स महाविद्यालय, नांदेड

२०२३

प्रस्तावना :

महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झाली. महाराष्ट्र हे भारताच्या सर्वात विकसनशील राज्यापैकी एक आहे. लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्र भारतातील दुसरे मोठे राज्य असून क्षेत्रफळाच्या दृष्टीने तिसरे राज्य आहे. महाराष्ट्र राज्याची सीमा गुजरात मध्यप्रदेश, छत्तीसगढ, तेलंगणा, कर्नाटक, गोवा, दादरा आणि नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशांशी जोडलेली आहे.

महाराष्ट्र राज्याच्या पश्चिमेला अरबी समुद्राची ७२० कि.मी.ची किनारपट्टी आहे. महाराष्ट्रातील जवळपास ११ कोटी लोकसंख्या असून मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी तर नागपूर उपराजधानी आहे. मुंबईमध्ये साधारण १.८ कोटी लोक राहतात. महाराष्ट्राचा विस्तार १,१८,८०९ चौरस मैल (३८७,७१० चौरस कि.मी.) एवढा आहे.

महाराष्ट्राला जगद्‌गुरु संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत चोखामेळा, संत एकनाथ, संत नामदेव, संत गाडगेबाबा यासारख्या अनेक महान संतांचा वारसा लावला आहे, त्यामुळे महाराष्ट्र राज्यास संतांची भूमी असे देखील म्हणतात.

हिंदवी स्वराज्याची स्थापना करणारे छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर याच महाराष्ट्रातील आहेत. याच महाराष्ट्राने समाजसुधारक, राष्ट्रभक्त, शास्त्रज्ञ कवी-लेखक, गायक, कलाकार आणि राजकीय पुढारी दिले आहेत. त्यातील महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष पहिले मुख्यमंत्री म्हणून पदभार सांभाळलेले यशवंतराव चव्हाण, मारोतराव कन्नमवार, पी.के.सावंत, वसंतराव नाईक, शंकरराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शरद पवार, बॅरिस्टर अब्दुल रहमान अंतुले, बॅरिस्टर बाबासाहेब भोसले, डॉ.शिवाजीराव पाटील निलंगेकर, सुधाकरराव नाईक, मनोहर जोशी, नारायण राणे, विलासराव देशमुख, सुशीलकुमार शिंदे, अशोकराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे, ना.एकनाथ शिंदे हे होते.

मराठी वाङ्मयामध्ये विविध प्रकार आणि प्रवाह आहेत, यामुळे निर्माण झालेल्या साहित्याने विपुल प्रमाणात भर घातली आहे. आजचा वर्तमान हा उद्याचा भुतकाळ आहे. काळ हा अखंड असून माणूस हा आरंभ आहे. जगाच्या पाठीवर माणूस असेपर्यंत साहित्य निर्मिती होत राहील. साहित्याची निर्मिती ही व्यक्तीच्या माध्यमातून होत असते. व्यक्ती हा समाजाचा घटक असतो. सामाजिक घटना ह्या साहित्य निर्मितीचे संदर्भ ठरत असतात. व्यक्तीचे जीवन, त्याचे वेगळेपण, विचार प्रवाह, चळवळ, वैचारिक मंथन हे संदर्भ म्हणून विचारात घ्यावे लागतात, म्हणूनच यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, शरद पवार, शंकरराव चव्हाण, सुशीलकुमार शिंदे या पाच 'महाराष्ट्रातील माजी मुख्यमंत्र्यांवर लिहिलेल्या मराठी साहित्याचा एक विवेचक अभ्यास' हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

अभ्यास विषयाची निवड :

महाराष्ट्र राज्याच्या जडणघडणीत आणि सर्वांगीण विकासात महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्यापासून विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यापर्यंत प्रत्येक माजी मुख्यमंत्र्यांनी काहींना काही योगदान दिलेले आहे. यापैकी प्रत्येकांची कार्यपद्धती आणि विचार सरणी वेगळी असली तरी त्यांच्या ध्येयधोरणातून महाराष्ट्राच्या विकासाला निश्चितच हातभार लागला आहे. आजवर झालेले २० मुख्यमंत्री यांच्या कार्याचा अभ्यास करणे प्रस्तुत प्रबंधाच्या दृष्टीने सोयीचे नसल्यामुळे यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, शदर पवार, शंकरराव चव्हाण, सुशीलकुमार शिंदे या निवडक पाच माजी मुख्यमंत्र्यांच्या विचारकार्यांचा सामाजिक, राजकीय, आर्थिक, साहित्यिक, औद्योगिक, कृषीविषयक, सांस्कृतिक या पैलूंचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधात अपेक्षित आहे, म्हणून या पाच माजी मुख्यमंत्र्यांच्या योगदानाबद्दल मराठी साहित्यात उमटलेल्या साहित्यातील प्रतिबिबांचा अभ्यास करून ते कार्य अधोरेखित करणे आवश्यक असल्यामुळे प्रस्तुत अभ्यास विषयाची मी जाणीवपूर्वक निवड केली आहे.

संशोधनाचे उद्दिष्ट्ये :

१. प्रत्युक संशोधनातील पाच माजी मुख्यमंत्र्यांच्या जीवन कार्यावर केलेल्या लेखनाचा तटस्थपणे अभ्यास करणे.

२. प्रस्तुत संशोधनातील पाच माजी मुख्यमंत्र्यांनी केलेल्या कार्याविषयी मराठी साहित्यात उमटलेले प्रतिबिंब तपासून त्याचे मूल्यमापन करणे.

३. प्रस्तुत संशोधनातील पाच माजी मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राच्या सामाजिक विकासात दिलेले योगदान व मराठी साहित्यिकांनी त्यांच्या घेतलेल्या नोंदी चिकित्सक पद्धतीने तपासणे.

४. प्रस्तुत संशोधनातील पाच माजी मुख्यमंत्र्यांच्या राजकीय विचारसरणीचा अभ्यास करून त्यांच्या त्या क्षेत्रातील योगदानाची यथायोग्य नोंद घेणे.

५. प्रस्तुत संशोधनातील पाच माजी मुख्यमंत्र्यांची जीवन विचारसरणी जडणघडण आणि योगदान यांची आंतरिक आशयसूत्रे तपासून प्रत्येकांचे वेगळेपण तुलनात्मक पद्धतीने अधोरेखित करणे.

संशोधनाचे गृहितके :

१. प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने निवडलेल्या पाच माजी मुख्यमंत्र्यांच्या जीवन कार्यावर झालेले विविधांगी लेखन तटस्थपणे झालेले आहे.

२. प्रस्तुत संशोधनाच्या अनुषंगाने निवडलेल्या पाच माजी मुख्यमंत्र्यांच्या कामगीरीचे मराठी वाङ्मय प्रकारांमधून प्रतिबिंब उमटलेले आहे.

३. प्रस्तुत संशोधनातील माजी पाच मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राच्या सामाजिक विकासात दिलेले योगदानाच्या अनुषंगाने मराठी साहित्यिकांनी नोंद घेतलेल्या आहेत.

४. प्रस्तुत संशोधनातील माजी पाच मुख्यमंत्र्याच्या व्यक्तित्वावर राजकीय विचार सरणीचा प्रभाव जाणवतो.

५. प्रस्तुत संशोधनातील माजी पाच मुख्यमंत्र्याच्या जीवनावरील विचार सरणीची जडणघडण आणि त्यांचे आंतरिक अशय सुत्रे तसेच वेगळेपणाच्या अंगाने तुलनात्मक अभ्यास झालेला आहे.

संशोधनाची पद्धत :

"महाराष्ट्रातील माजी मुख्यमंत्र्यांवर लिहिलेल्या मराठी साहित्यकृतीचा चिकित्सक अभ्यास" या विषयावरचे संशोधन करीत असतांना मी वर्णनात्मक / विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करणार आहे.

यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, शरद पवार, शंकरराव चव्हाण, सुशीलकुमार शिंदे या पाच माजी मुख्यमंत्र्यांविषयी उपलब्ध मराठी साहित्याचा प्रस्तुत संशोधानासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे. तथ्य संकलनामध्ये द्वितीय स्त्रोताचा वापर केला जाणार असून यामध्ये आजपर्यंत वरील पाच माजी मुख्यमंत्र्यावर महाराष्ट्रातील ज्या लेखकांनी लेख-कविता आणि पुस्तके लिहिलेली आहेत त्या सर्व पुस्तकांचा, संदर्भग्रंथांचा अभ्यास केला जाणार आहे.

यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, शरद पवार, शंकरराव चव्हाण, सुशीलकुमार शिंदे या पाच माजी मुख्यमंत्रीच्या संदर्भातील उपलब्ध साधन सामग्री जमा करणे आणि त्याचा विवेचक, चिकित्सक अभ्यास करुन निष्कर्षापर्यंत पोहोचणे हे प्रस्तुत संशोधकाचे नियोजन आहे.

संशोधनाचे महत्त्व :

आजवर झालेले महाराष्ट्राचे २० मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, मारोतराव कन्नमवार, पी.के.सावंत, वसंतराव नाईक, शंकरराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शरद पवार, बॅरि. अब्दुल रहमान अंतुले, बॅरि. बाबासाहेब भोसले, डॉ.शिवाजीराव पाटील निलंगेकर, सुधाकरराव नाईक, मनोहर जोशी, नारायण राणे, विलासराव देशमुख,

सुशीलकुमार शिंदे, अशोकराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे, ना.एकनाथ शिंदे हे आहेत.

त्यापैकी यशवंतरावच चव्हाण, वसंतराव नाईक, शरद पवार, शंकरराव चव्हाण, सुशीलकुमार शिंदे या पाच माजी मुख्यमंत्र्यांचे योगदान इतरांपेक्षा वेगळे आहे असे प्रस्तुत संशोधकाचे मत असल्यामुळे संशोधकाने या पाच माजी मुख्यमंत्र्यांच्या कारकिर्दीचा एक विवेचक अभ्यास करण्याचे ठरविले आहे. हा विषय आजवर मराठी साहित्याच्या क्षेत्रात झालेल्या संशोधनापेक्षा वेगळा आहे असा प्रस्तुत संशोधकाचा विश्वास आहे. या पाच माजी मुख्यमंत्र्यांचे योगदान समकालीन व भावी पिढीसाठी मार्गदर्शक ठरणारे असणार आहे म्हणून हे संशोधन महत्वाचे वाटते.

संशोधन प्रबंधाची रूपरेषा :

प्रकरण पहिले : प्रास्ताविक

कोणत्याही राज्याचा मुख्यमंत्री हा त्या राज्याच्या विकास प्रक्रियेचा कप्तान असतो. त्यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली शासकीय आणि प्रशासकीय यंत्रणा कार्यरत असते. आजवर मराठी साहित्यात या अंगाने अभ्यास झालेला नाही म्हणून प्रस्तुत प्रास्ताविक प्रकरणात यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, शरद पवार, शंकरराव चव्हाण, सुशीलकुमार शिंदे या पाच माजी मुख्यमंत्र्यांची जडणघडण, वैचारिक अधिष्ठान, विविध क्षेत्रातील त्यांचे योगदान, सामाजिक कार्य आणि कर्तृत्व आणि मराठी साहित्यात त्याचे उमटलेले प्रतिबिंब यांचा ओझरता अभ्यास अपेक्षित आहे.

प्रकरण दुसरे : पाच माजी मुख्यमंत्र्यांचे सामाजिक योगदान

प्रत्येक मुख्यमंत्री सामाजिक अंगाने अभ्यास करून समाजाच्या विकासात आपल्याला काय योगदान देता येईल याचा विचार करत असतो. प्रत्येकाला आपली कारकीर्द लक्षणीय ठरावी असे वाटणे स्वाभाविक असते. त्या दृष्टीने यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, शरद पवार, शंकरराव चव्हाण, सुशीलकुमार शिंदे या पाच माजी मुख्यमंत्र्यांनी दिलेले सामाजिक योगदान अभ्यासने प्रस्तुत प्रकरणात अपेक्षित आहे.

प्रकरण तिसरे : पाच माजी मुख्यमंत्र्यांचे राजकीय योगदान

प्रत्येक व्यक्तीची जडणघडण एका विशिष्ट राजकीय तत्वप्रणालीत झालेली असते. यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, शरद पवार, शंकरराव चव्हाण, सुशीलकुमार शिंदे हे पाचही माजी मुख्यमंत्री भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सदस्य असले तरी प्रत्येकांची जडणघडण वेगळ्या वातावरणात झालेली आहे. या पाचही माजी मुख्यमंत्र्यांच्या जडण घडणेतील संस्कार आणि प्रभाव अभ्यासाने आणि तो अधोरेखित करणे प्रस्तुत प्रकरणात अपेक्षित आहे.

प्रथकरण चौथे : पाच माजी मुख्यमंत्र्याचे मराठी साहित्यात उमटलेले प्रतिबिंब

साहित्य हा समाज जीवनाचा आरसा असतो. साहित्यात समाजात घडणाऱ्या घटना घडामोडीचे, चळवळीचे, उलथापालथीचे पडसाद उमटत असतात. मुख्यमंत्री हे तर समाजाच्या जडणघडणीतील कर्ते पुरुष असतात. त्या त्या मुख्यमंत्र्यांच्या काळात झालेल्या कामाचे प्रतिबिंब समकालीन मराठी साहित्यात कसे आणि किती उमटले आहेत याचा एक विवेचक अभ्यास प्रस्तुत प्रकरणात अपेक्षित आहे.

प्रकरण पाच : पाच माजी मुख्यमंत्र्यांचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व कार्य

प्रस्तुत प्रकरणात यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, शरद पवार, शंकरराव चव्हाण, सुशीलकुमार शिंदे या पाच माजी मुख्यमंत्र्यांच्या व्यक्तीमत्त्वाची जडणघडण आणि

त्यांनी केलेल्या कार्याचा स्वतंत्रपणे आढावा घेण्यात येईल तसेच त्यांचा तौलनिक अभ्यासही करण्यात येईल.

उपसंहार व निष्कर्ष :

प्रस्तुत प्रबंधाच्या शेवटी मागील पाच प्रकरणाच्या माध्यमातून जो विवेचक अभ्यास केला आहे त्या संशोधनाच्या अंती हाती येणारे निष्कर्ष प्रस्तुत प्रकरणात मांडण्यात येतील.

संदर्भ सूची :

१. यशवंतराव चव्हाण व्यक्ती व कर्तृत्व, गोविंद तळवलकर, मौज प्रकाशन गृह, मुंबई.

२. महाराष्ट्राचे शिल्पकार वसंतराव नाईक, उत्तम रुद्रावार, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.

३. महाराष्ट्राचे शिल्पकार शंकरराव चव्हाण, डॉ.सुरेश सावंत, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई

४. शरद पवार व्यक्तित्व, नेर्तृत्व आणि कर्तव्य, डॉ.जनार्दन वाघमारे, निर्मल प्रकाशन, नांदेड

५. आदर्श लोकनेता यशवंतराव चव्हाण, भगवान अंजनीकर, निर्मल प्रकाशन, नांदेड

६. शदद पवार पॉवर निती, डॉ.यशराज पारखी, ई साहित्य प्रतिष्ठान, माण जि.पुणे.

७. महाराष्ट्र राज्याचे २० मुख्यमंत्री आणि त्यांचे राजकीय कर्तत्व आम्ही भारताचे लोक, संपादक प्रा.अशोककुमार दवणे, शब्ददान प्रकाशन, नांदेड

८. कृष्णाकाठ, यशवंतराव चव्हाण, रोहण प्रकाशन, पुणे.

९. लोक माझे सांगाती, शरद पवार,मधुश्री पब्लिकेशन, पुणे.

१०. शरद पवार आणि मी, ना.धो.महानोर, समकालीन प्रकाशन, पुणे.

११. यशवंतराव चव्हाण आणि मी, ना.धों.महानोर, समकालीन प्रकाशन, पुणे.

१२. यशवंतराव चव्हाण, ना.धो.महानोर व्यक्ती आणि वाङ्मय.

१३. एका संघर्षाची वाटचाल, सुशीलकुमार शिंदे.

१४. आधुनिक भगीरथ, ना.शंकरराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दीनिमित्त प्रकाशित गौरवग्रंथ, संपादक डॉ.सुरेश सावंत, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई.

१५. जलशंकर, डॉ.सुरेश सावंत, अभंग प्रकाशन, नांदेड

संशोधक

अशोक गणपतराव दवणे
एम.ए. (मराठी)

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ.नागनाथ पाटील
योगानंद महाविद्यालय वसमत, जि.हिंगोली